महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७१ वे | दिनांक : ०३/०३/२०२६ | वार : मंगळवार

# राज्यसभेच्या एका जागेसाठी मविआतील तिन्ही पक्षांची दावेदारी




**मुंबई** : महाराष्ट्रातील राज्यसभेच्या ७ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार असून, महाविकास आघाडीच्या वाट्याला केवळ एकच जागा येणार असल्याने जागावाटपाचा पेच निर्माण झाला आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार निवृत्त होत असल्याने ही जागा आपल्याकडेच राहावी, असा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा आग्रह आहे. तर सर्वाधिक आमदार असल्याने उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनेही या जागेवर दावा ठोकला आहे. मात्र, राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद शाबूत ठेवण्यासाठी काँग्रेसनेही या एकमेव जागेसाठी मोर्चेबांधणी सुरू केली असून, महाविकास आघाडीतील मित्रपक्षांकडे या जागेची मागणी केली आहे.

या पेचावर तोडगा काढण्यासाठी काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी फोनवर चर्चा करून एक नवा प्रस्ताव मांडला आहे. राज्यसभेची ही जागा काँग्रेसला सोडल्यास, त्याबदल्यात विधान परिषदेची आगामी रिक्त होणारी जागा खुद्द उद्धव ठाकरेंना देण्याची तयारी काँग्रेसने दर्शवली आहे. राष्ट्रीय पातळीवर 'इंडिया' आघाडीचे संख्याबळ टिकवण्यासाठी आणि राज्यात महाविकास आघाडीची एकजूट कायम राखण्यासाठी हा समझोता महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास काँग्रेसकडून व्यक्त केला जात आहे.

राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद टिकवण्यासाठी एकूण सदस्यसंख्येच्या किमान १० टक्के म्हणजेच २५ सदस्यांचे संख्याबळ असणे अनिवार्य असून, सध्या २७ सदस्य असलेल्या काँग्रेसला आगामी ७२ जागांच्या निवडणुकीनंतर हे संख्याबळ २५ च्या खाली जाण्याची धास्ती वाटत आहे. विशेषतः जूनमध्ये मल्लिकार्जुन खर्गे यांचा कार्यकाळ संपत असल्याने त्यांचे महत्त्वाचे पद वाचवण्यासाठी काँग्रेसला प्रत्येक जागा जिंकणे अत्यंत आवश्यक झाले आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातून रजनी पाटील यांच्या निवृत्तीमुळे रिक्त होणारी जागा पुन्हा मिळवणे ही काँग्रेससाठी केवळ प्रतिष्ठेची लढत नसून तांत्रिकदृष्ट्याही एक अनिवार्य गरज बनली आहे.

पहिल्या टप्प्यातील ३७ जागांपैकी काँग्रेसचे अभिषेक मनु सिंघवी, रजनी पाटील, फुलोदेवी नेताम आणि केटीएस तुलसी या काँग्रेस नेत्यांचा कार्यकाळ संपुष्टात येत असून, जूनमध्ये खुद्द पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचीही मुदत संपणार आहे. या निवडणुकांमध्ये पुरेसे संख्याबळ राखण्यात काँग्रेसला अपयश आल्यास त्यांना राज्यसभेतील अत्यंत महत्त्वाचे विरोधी पक्षनेते पद गमवावे लागण्याची शक्यता आहे. परिणामी, महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या वाट्याला येणारी सुरक्षित जागा मिळवण्यासाठी काँग्रेसने आग्रही पवित्रा घेतला असून, आता उद्धव ठाकरे आणि शरद पवार या प्रस्तावावर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# परळी हादरणार? : मनोज जरांगे पाटील यांचा मोठा दावा



**बीड** : परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांची २० ऑक्टोबर २०२३ रोजी तहसील कार्यालयासमोर निर्घृण हत्या करण्यात आली होती. दिवसाढवळ्या घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण परळी हादरून गेली होती. त्या दिवसापासून मुंडे कुटुंब न्यायाच्या प्रतीक्षेत आहे. सुरुवातीला या मृत्यूबाबत विविध तर्कवितर्क लावले गेले; मात्र कुटुंबीयांनी हा अपघात नसून पूर्वनियोजित खून असल्याचा ठाम आरोप केला होता. या पार्श्वभूमीवर आता या प्रकरणात नवनवीन घडामोडी समोर येत असून तपास अंतिम टप्प्यात पोहोचल्याची माहिती मिळत आहे.

या हत्येच्या तपासासाठी राज्य सरकारने विशेष तपास पथकाची नियुक्ती केली होती. तपासादरम्यान संशयितांची नार्को चाचणी करण्यात आली. काही दिवसांपूर्वी या दोन्ही तांत्रिक चाचण्यांचे अहवाल अधिकृतपणे विशेष तपास पथकाकडे सुपूर्द करण्यात आल्याचे समजते. या अहवालांमधून अनेक महत्त्वाचे धागेदोरे समोर आले असून प्रकरणातील गूढ उकलण्यास मदत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे तपास आता निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याची चर्चा सुरू झाली आहे.

या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी बीड येथे पत्रकारांशी संवाद साधताना खळबळजनक विधान केले. महादेव मुंडे हत्या प्रकरणात अशी काही धक्कादायक नावे पुढे येतील की संपूर्ण परळी हादरून जाईल, असा दावा त्यांनी केला. तपास अंतिम टप्प्यात असून अहवाल न्यायालयासमोर सादर झाल्यानंतर अनेक गोष्टी स्पष्ट होतील, असेही त्यांनी नमूद केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

ही कायदेशीर प्रक्रिया आहे. अहवाल आल्यानंतर तो न्यायालयात मांडला जाईल आणि त्यानंतर पोलिस काही नावे जाहीर करतील. मलाही काही नावे माहिती आहेत; परंतु तपासात अडथळा निर्माण होऊ नये म्हणून मी ती नावे सध्या सांगणार नाही, असे स्पष्ट शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. मोठी आणि प्रभावशाली नावे समोर येण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे परळीमध्ये राजकीय आणि सामाजिक स्तरावर चर्चांना उधाण आले आहे.

महादेव मुंडे यांच्या मृत्यूनंतर सुरुवातीपासूनच या प्रकरणात राजकीय लागेबांधे असल्याची चर्चा होती. कुटुंबीयांनी सातत्याने निष्पक्ष तपासाची मागणी केली होती. मनोज जरांगे पाटील यांनी या प्रकरणाचा पाठपुरावा केल्यानंतर प्रशासनाने विशेष तपास पथक स्थापन केले होते. आता नार्को आणि मेंदू नकाशा चाचण्यांचे अहवाल तपास यंत्रणेकडे आल्यामुळे सत्य बाहेर येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्र्यांनीही या प्रकरणात स्वतः लक्ष घातल्याचे सांगितले जात असून तपास वेगाने पुढे नेला जात आहे.

आता सर्वांचे लक्ष या तांत्रिक अहवालांवर आहे. या अहवालांमुळे कोणाचे पितळ उघड पडणार, कोणावर कारवाई होणार आणि मुंडे कुटुंबाला न्याय कधी मिळणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. तपास यंत्रणेला कोणताही अडथळा येऊ नये म्हणून माहिती असूनही ती उघड न करण्याची भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतली आहे. पुढील काही दिवसांत न्यायालयीन प्रक्रियेनंतर या प्रकरणातील सत्य बाहेर येण्याची शक्यता असून परळीकरांचे लक्ष आता या तपासाच्या निकालाकडे लागले आहे.

# जालन्याचे खासदार कल्याण काळे दुबईत अडकले : इराणच्या हल्ल्यांमुळे युद्धजन्य स्थिती



**जालना** : इराण आणि इस्रायल-अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या तीव्र लष्करी संघर्षाचे पडसाद आता आखाती देशांत उमटत असून, इराणने दुबईसह विविध शहरांतील अमेरिकेच्या लष्करी तळांना आणि महत्त्वाच्या इमारतींना लक्ष्य केल्याने तिथे युद्धाची भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. या युद्धजन्य परिस्थितीत जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे हे देखील दुबईत अडकल्याची माहिती समोर आली असून, त्यांच्यासह राज्यातील आणि देशातील हजारो नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

खासदार कल्याण काळे यांनी फेसबुकवर पोस्ट शेअर करत महत्त्वाची माहिती दिली आहे. खासदार डॉ. कल्याण काळे हे परिवारासह पूर्वनियोजित दौऱ्यानिमित्त दुबई येथे गेले आहेत. त्यांचा आमच्याशी नियमित संपर्क सुरू आहे. साहेब पूर्णपणे सुखरूप असून त्यांच्या प्रकृती व सुरक्षिततेबाबत कोणतीही चिंता करण्याचे कारण नाही. म्हणून सर्व कार्यकर्ते, नागरिक व हितचिंतकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन काळे यांच्या संपर्क कार्यालयाने केले आहे.

दरम्यान, नागपूरच्या चिकटे आणि घारफेंडे कुटुंबातील ९ सदस्य सध्या दुबईत अडकले असून, इराण-इस्रायल युद्धामुळे निर्माण झालेल्या तणावामुळे त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. पर्यटनासाठी गेलेल्या या प्रवाशांना ३ मार्च रोजी मायदेशी परतायचे होते, मात्र दुबई विमानतळ अचानक बंद करण्यात आल्याने त्यांचा प्रवास रखडला आहे. मिसाईल हल्ल्यांच्या दहशतीमुळे या पर्यटकांना हॉटेलबाहेर पडण्यास सक्त मनाई करण्यात आली असून, सध्या हॉटेल प्रशासनाकडूनच त्यांच्या भोजन आणि निवासाची सोय केली जात आहे. या संकटकाळात आपल्याला सुरक्षितरीत्या बाहेर काढण्यासाठी या कुटुंबांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे मदतीची आर्त हाक दिली आहे.

पुण्यातील एका महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल दुबईला गेली होती. मात्र दुबईत अचानक झालेल्या हल्ल्यामुळे तिथे युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असल्याने हे ८० विद्यार्थी दुबईतच अडकले आहेत. या विद्यार्थ्यांमध्ये हिंगोलीच्या खुशी बडेरा या विद्यार्थिनीचा देखील समावेश आहे. खुशीसह ८० विद्यार्थी सुखरूप असल्याची माहिती तिच्या वडिलांनी महावीर बडेरा यांनी दिली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ मार्च २०२६

## स. भु. प्रशालेचे धावण्याच्या स्पर्धेत घवघवीत यश




**छत्रपती संभाजीनगर :** श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्था छत्रपती संभाजीनगर आयोजित आंतरशाखीय धावण्याच्या स्पर्धेत स. भु. प्रशाला छत्रपती संभाजीनगरच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. शंभर मीटर धावण्याच्या स्पर्धेत मुलींच्या गटाच्या कु.दुहिता शिंदे सर्वप्रथम आली आहे. तर हर्षदा मुरकुटे हिने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच मुलांमधून प्रणित सुपेकर हा सर्व तृतीय आला आहे. सन्मान पदक (मेडल) व आर. के. स्पोर्टस शॉपीतर्फे ५००० हजार, ३००० व २००० रूपयांचे बक्षीसरूपी गीफ्ट व्हाउचर मिळाले आहे. त्यांना संघ व्यवस्थापक योगेश मुंगीकर , चंद्रशेखर पाटील व क्रीडा शिक्षक संजय कंटुले, सूरज सुलाने,सुरेश म्हस्के आदींचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल प्रशालेचे शालेय समितीचे अध्यक्ष श्री.ज्ञानप्रकाश मोदाणी , मुख्याध्यापक श्री. विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक श्री. अनिल देशमुख, पर्यवेक्षक श्री. विजय चापाईतकर, श्री. संजय परदेशी आदींनी व शिक्षक-शिक्षकेतर सहकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## ग्रामीण रुग्णालय भंगार साठवून ठेवलेले हॉलचा उपयोग चांगल्या कामासाठीच..





**जिंतुर (बी.डी.रामपूरकर) :** ग्रामीण रुग्णालय येथील हॉल शासनाने २५ लाख रुपये खर्च करून धर्मशाळा उभारणी करण्यात आली परंतु कित्येक महिन्यापासून या मध्ये भंगार साहित्य ठेवण्यात आले होते. संपूर्ण हॉल स्वच्छ करण्यात आले हॉलचा उपयोग रुग्णांकरिता करण्यात येणार असून सोमवार (तिसरा)... मानसिक रुग्ण तपासणी. मंगळवार.. लसीकरण व नेत्र तपासणी. बुधवार... गरोदर माता वतपासणी व रजोनिवृत्ती clinic गुरुवार - दिव्यांग तपासणी (दुसरा व चौथा) शुक्रवार- आठवडी बैठक अशा प्रकारे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती व वैद्यकीय अधीक्षक डॉ. मस्के यांनी दिली

## प्रतिक्षा बेंडगे गणित सेमिनार स्पर्धेत प्रथम




**उमरगा :** श्री छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा येथे २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी भूषविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. चेताली सुरवसे यांनी केले. प्रास्ताविक गणित विभागप्रमुख डॉ. वसंत गायकवाड यांनी केले, तर विज्ञान असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. एम. एस. निर्मळे यांनी आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पी. एस. माने सर तसेच लोहरा येथील भानुदासराव चव्हाण कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. ढोकळे यांनी मार्गदर्शनपर व्याख्याने दिली. यावेळी डॉ. पी. एस. माने सर यांच्या हस्ते बी.एस्सी. I ते VI सेमिस्टरसाठी तयार केलेल्या Industrial Chemistry Practical Book चे प्रकाशन करण्यात आले.राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त गणित विभागातर्फे गणित सेमिनार स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेत कुमारी प्रतिक्षा बेंडगे हिने प्रथम क्रमांक पटकावला. कुमारी सौंदर्या पवार हिने द्वितीय क्रमांक मिळविला, तर कुमारी पल्लवी कांबळे हिला तृतीय क्रमांक मिळाला. उत्तेजनार्थ पारितोषिक कुमारी शकीना लांडगे हिला मिळाले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राध्यापक अतुल गायकवाड व प्राध्यापिका जयश्री समाने यांनी काम पाहिले. कार्यक्रमास उपप्राचार्य व्ही. एस. इंगळे सर, प्रभारी प्राध्यापक ए. एस. पदमपल्ले, आयक्यूएसी समन्वयक व्ही. डी. देवरकर, कोर्स समन्वयक डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. लबडे सर, डॉ. रेवते, डॉ. डी. व्ही. माने सर तसेच विज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

श्री छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा येथे २८ फेब्रुवारी २०२६ रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी भूषविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. चेताली सुरवसे यांनी केले. प्रास्ताविक गणित विभागप्रमुख डॉ. वसंत गायकवाड यांनी केले, तर विज्ञान असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. एम. एस. निर्मळे यांनी आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पी. एस. माने सर तसेच लोहरा येथील भानुदासराव चव्हाण कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. के. ढोकळे यांनी मार्गदर्शनपर व्याख्याने दिली. यावेळी डॉ. पी. एस. माने सर यांच्या हस्ते बी.एस्सी. I ते VI सेमिस्टरसाठी तयार केलेल्या Industrial Chemistry Practical Book चे प्रकाशन करण्यात आले.राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त गणित विभागातर्फे गणित सेमिनार स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ९ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेत कुमारी प्रतिक्षा बेंडगे हिने प्रथम क्रमांक पटकावला. कुमारी सौंदर्या पवार हिने द्वितीय क्रमांक मिळविला, तर कुमारी पल्लवी कांबळे हिला तृतीय क्रमांक मिळाला. उत्तेजनार्थ पारितोषिक कुमारी शकीना लांडगे हिला मिळाले. या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्राध्यापक अतुल गायकवाड व प्राध्यापिका जयश्री समाने यांनी काम पाहिले. कार्यक्रमास उपप्राचार्य व्ही. एस. इंगळे सर, प्रभारी प्राध्यापक ए. एस. पदमपल्ले, आयक्यूएसी समन्वयक व्ही. डी. देवरकर, कोर्स समन्वयक डॉ. व्ही. एस. सूर्यवंशी, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लबडे सर, डॉ. रेवते, डॉ. डी. व्ही. माने सर तसेच विज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

## जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ मार्च २०२६


## राजभाषा मराठी ही फक्त बोलीभाषा नसून स्वाभिमान आहे - प्रा. सागर चाबुकस्वार



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्रातचं नव्हे तर शेजारच्या प्रांतात सुद्धा मराठी भाषेला महत्त्व आहे, त्याबद्दल आत्मियता आहे. आपली कार्यालयीन भाषा जरी मराठी असली. तरी याचा अर्थ असा नाही की, आपल्याला कामामुळे मराठीत बोलावे लागते. खरं तर आपल्याला जिव्हाळा आहे मराठी भाषेचा.आज अभिजात दर्जा जरी भेटला असेल. तरी या भाषेला सुरुवातीपासुनचं फार महत्त्व आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि आपल्या अभंगातून मराठी भाषेचं साहित्य मोठ्या प्रमाणावर निर्माण करण्याचं काम संतांनी केले आहे.छत्रपती शिवाजी महाराजांपासून तर फुले-शाहु- आंबेडकरांची चळवळ असेल.या महापुरुषांमुळे मराठी माणसाचा जगात नावलौकिक झाला आहे.यामुळेचं मराठी ही फक्त भाषा नसुन आपल्याला स्वाभिमानाने रहायला शिकवते. परंतू मराठी माणसाची आता मोठी जबाबदारी आहे. त्यांनी उद्योगांमध्ये उतरुन मराठी व्यक्तीला मोठे केले पाहीजे. त्यापलीकडे जाऊन ज्या मराठी भाषेमुळे आज आपण मोठे झाले आहोत.ती भाषा टिकवणे फार गरजेचे आहे.त्यासाठी मराठी शाळा वाचल्या पाहीजेत. त्यासाठी आपण लक्ष दिले पाहिजेत. असे प्रतिपादन महानायक सोशल वेलफेअर फाऊंडेशन अंतर्गत कम्युनिटी क्लासरुम तर्फे मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त श्रीकृष्ण माध्यमिक व प्राथमिक विद्यालय ,पैठण रोड. छ. संभाजीगर येथे आयोजित कार्यक्रमात प्रा.सागर चाबुकस्वार बोलत होते. प्रशालेतील विद्यार्थी - विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व शिक्षकवृंदानी कार्यक्रमासाठी सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सदस्य अंकुश म्हस्के, संतोष काकडे, किशोर मगरे, प्रेम सपाटे, आशिष त्रिभुवन, मोहन खंडागळे, सागर बहिरे व दिपक वाघमारे यांनी परीश्रम घेतले.

## जीवनात सप्तरंग भरू

प्रेम रंगात न्हाऊ चला,
दादा भाऊ आपण सारे.
अवती- भवती सर्वत्र,
सुटले आहे विषारी वारे.

चंगळवादी दुनियेत या,
संस्कृतीचे रक्षण करू.
आपण सारे एकत्र येऊन,
मानवतावादी विचार पेरू.

रंगोत्सव साजरा करतांना,
एकमेकांची काळजी घेऊ.
संकट काळात सर्वांना,
मदतीचा हात सदा देऊ.

लाल निळा केशरी पिवळा
रंग उधळिता फुलले गाव
सप्तरंगांची उधळण होता
गळून पडले द्वेष मत्सर भाव
विचारांच्या रंगात न्हाऊन,
उधळूया विकासाचे रंग.
सारेच आता काळजी घेऊ,
होणार नाही शांतता भंग.

रंगोत्सव खेळतांना आज,
सप्तरंगात रंगून जाऊ.
द्वेष मत्सर विसरून सारे,
समतेचे एकतेचे गीत गाऊ.

वैरभाव,निराशा संपवून,
जीवनात सप्तरंग भरू.
मानवतेच्या कल्याणासाठी,
सारेच आपण प्रयत्न करू.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## रंगपंचमी

रंगपंचमीच्या दिवशी
नैसर्गिक रंग खेळूया
आपण सारे मिळून
निसर्गाचे नियम पाळूया

बिट फळभाजीपासून
रंग बनवूया लाल
उत्साहाने भिजवूया
एक दुसऱ्याचे गाल

वावडींगाच्या बियापासून
बनवूया जांभळा रंग
पिचकारीत भरूनी
भिजवूया दुसऱ्याचे अंग

पळसाच्या फुलांपासून
बनवूया केशरी रंग
रंगपंचमीचा आनंद
लुटूया मित्रासंग

पालकाच्या भाजीपासून
रंग बनतो हिरवा
होळी रे होळी म्हणत
गल्लीबोळात मिरवा

रासायनिक रंगाला
नको आता थारा
नैसर्गिक रंग खेळूनी
आनंद लुटूया न्यारा



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## जंगलाचा डॉक्टर, संकटग्रस्त खवले मांजरावर विद्यार्थ्यांसोबत "वनसंवाद"



**कन्नड (अरुण थोरात) :** जगातील सर्वात मोठया प्रमाणात तस्करी व शिकार होणारा प्राणी म्हणजे खवले मांजर(पेंगोलीन). अंगावर खवले असणारा एकमेव सस्तन प्राणी ही वैशिष्ट्य पूर्ण ओळख व हीच खवले धारी ओळख या वन्यजीवाच्या जीवावर उठली आहे. सर्व प्रकर च्या जंगलात विशेषतः डोंगरात हा वन्यजीव अधिवास करतो. अजिंठा डोंगरातील याचा अधिवासाची अपघाती नोंद झाली ती आजच्या बरोबर पाच वर्षा आधी ०३ मार्च २०२१ रोजी. सिल्लोड जवळ एका हॉटेल मध्ये विदेशात तस्करी करण्याच्या उद्देशाने मुंबई येथील तस्करांचे मोठे अंतरराष्ट्रीय रॅकेट पकडण्यात आले होते. त्यांच्या ताब्यातून हा जैवविविधतेचा महत्वाचा घटक सुखरूप सोडवून त्यास अधिवासात मुक्त करण्यात आला. २०२१ या एकाच वर्षात सिल्लोड जवळच्या अजिंठा डोंगरात खवले मांजर तस्करीच्या ०३ घटना घडल्या ज्या आजवर सह्याद्री पर्वत व कोकणातही एका वर्षात घडल्या नव्हत्या. तस्करांची 'नापाक' पावले "त्यांच्या दृष्टीने सुरक्षित समजल्या गेलेल्या अजिंठा डोंगराकडे वळली असल्याचे वन्यजीव संवर्धक अभिनव प्रतिष्ठानचे डॉ. संतोष पाटील यांच्या लक्षात आले.अनाड, तोंडापूर, देव्हारी, वडाळा ई ३ ठिकाणी ही तस्करी घडली होती. प्रत्येक घटनेत स्थानिक वन्यजीवांचे "शिकारी" यांचा धक्कादायक सहभाग उघडकीस आला होता.वनविभागा सोबत डॉ. पाटील यांनी संयुक्त रित्या डोंगरी भागात " वनजागर" हा जनजागृती पर उपक्रम राबविण्यात सुरुवात झाली. जागतिक वन्यजीव संवर्धन दिनाच्या निमित्ताने सिल्लोड येथील ज्ञानदीप विद्यालयात संस्थाध्यक्ष मधुकर गवळी यांच्या मार्गदर्शनाने " वन संवाद "साधला. शाळेच्या मु. अ. वदंना दिवेकर, मु. अ. सतिष बडक व सहकारी शिक्षकांची यावेळी उपस्थिती होती.

_जंगलाचा डॉक्टर खवले मांजर का आहे महत्वाचा - झाडांना लागणारी वाळवी, मुंग्या हे या वन्यजीवाचे अन्न असून रोज अंदाजे लाखाहून अधिक उपरोक्त जीव खाऊन तो जंगलातील झाडांचे वाळवी, उधई पासुन संरक्षण करतो. म्हणून यास "जंगलाचा डॉक्टर " म्हटले जाते. जमिनीत बिळ करून राहणारा या जीवास कोणताही नैसर्गिक शत्रू नाही. फक्त माणूसच त्याच्या जीवावर पैशाच्या हव्यासा पोटी उठला आहे.

**- डॉ. संतोष पाटील,**
**वन्यजीव संवर्धक, सिल्लोड.**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ मार्च २०२६

# जग जळतेय... संयुक्त राष्ट्रसंघ कुठे?

**आ**जच्या अस्थिर आणि संघर्षमय जागतिक परिस्थितीत आंतरराष्ट्रीय शांततेचे महत्त्व पुन्हा अधोरेखित होत आहे. अशा वेळी जागतिक सहकार्याची पायाभरणी करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या मूलभूत तत्त्वांचा आणि उद्दिष्टांचा अभ्यास करणे अधिकच आवश्यक ठरते.

वस्तूत: कोणत्याही संस्थेचा अथवा संघटनेचा अभ्यास करत असताना त्या संस्थेच्या सनदेची घटना अथवा उद्देशपत्रिका अभ्यासणे अनिवार्य ठरते. संयुक्त राष्ट्राचे उद्देश व तत्वांचे विश्लेषण प्रस्तावनेतच प्रतिबिंब दिसते. संयुक्त राष्ट्र संघटना असे नामकरण असलेली आंतरराष्ट्रीय संघटना वर्तमान काळात संयुक्त राष्ट्र या शब्दप्रयोगाने प्रचलित आहे. या संघटनेच्या उद्देशपत्रिकेची सुरुवात ही लक्षवेधी ठरते. **“आम्ही संयुक्त राष्ट्रांचे लोक येणाऱ्या पिढीला युद्धाच्या विनाशापासून वाचविण्याचा दृढ संकल्प करत आहोत. युद्धाच्या या भीषण महाविनाशाने दोन वेळेस मानवाला अनेक कष्ट दिले आहेत. आम्ही स्त्री-पुरुष आणि छोट्या मोठ्या राष्ट्राला समान अधिकाराबाबतच्या विश्वासात नव्याने स्पष्ट करत आहोत की, ज्या अंतर्गत संस्था आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्याप्रति सर्वांना न्याय व सन्मान यांचा आदर उत्पन्न होईल. आम्ही सामाजिक प्रगती आणि स्वातंत्र्य यांचा पुरस्कार करून समाजामध्ये व्यक्तीचे उच्च जीवनस्तर बनवण्यासाठी प्रयत्नशील आहोत.”**

**तसेच या उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी आम्ही सहनशीलतेच्या भावनेबरोबरच सर्वांच्या सोबत एका चांगल्या शेजाऱ्याप्रमाणे शांततेच्या व सहिष्णू वातावरणात राहू. आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षितता, सुव्यवस्था आणि सहकार्य निर्माण करण्यासाठी आम्ही आपल्या सर्व शक्ती एकत्र करून असे निश्चित करत आहोत की, समान हिताच्या व सामुहिक संरक्षणाचा अपवाद वगळता सशस्त्र सेनांचा उपयोग करणार नाहीत. आम्ही आपल्या सर्व लोकांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी अधिक दृढनिश्चयी करत आहोत.**

**त्या अनुषंगाने, सॅन फ्रान्सिस्को शहरात जमलेल्या आमच्या प्रतिनिधींनी, आपल्या संबंधित सरकारांच्या योग्य आणि संपूर्ण अधिकारांच्या आधारे, या “संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेस” मान्यता देऊन, संयुक्त राष्ट्रसंघ (United Nations) या नावाने एक आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन केली आहे.**

जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या विनाशातून वाचवण्यासाठी आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षितता सहकार्य स्थापन करण्यासाठी विविध राष्ट्रांच्या सहकार्य व समन्वयातून आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी मानवाधिकारांचे संरक्षण, निशस्त्रीकरण, नव आर्थिक व्यवस्था स्थापन करणे यासारख्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी द्वितीय महायुद्धाच्या विध्वंसक पार्श्वभूमीवर २४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघ - युएन अस्तित्वात आला. मानवतेसाठी कार्य करण्याची भूमिका युएनची सतत राहली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध संघटनाच्या माध्यमातून दुष्काळ निवारण फंड, निर्वसाहतीकरणाबाबत कार्य, तसेच कांगो, पूर्व तिमोर, कोसोवो यासारख्या राष्ट्रांमध्ये यशस्वी शांतीसैनिक मोहिमा, कंबोडिया, मोझांबिक, ग्वाटेमाला सारख्या देशांमधील नागरी संघर्ष सोडवण्यास युएनने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. शीतयुद्ध कालीन परिस्थितीमध्ये, अण्वस्त्र चाचणी बंदी करार, खाडी युद्ध बाबत युएनची भूमिका मध्यवर्ती राहली आहे. मानवी हक्क व पर्यावरणबाबत विविध करार आजही महत्वपूर्ण आहे. परंतु, बदलत्या परिस्थितीत आज ऐंशी वर्षानंतर या संघटनेच्या उद्दिष्टांचा वास्तवाशी ताळमेळ साधतांना अनेक प्रश्न निर्माण होतांना दिसतात. संयुक्त राष्ट्रसंघाचे आदर्श कितपत प्रत्यक्षात उतरले आहेत? जागतिक न्याय, समानता आणि शांततेच्या दिशेने किती प्रगती झाली आहे? मानवी प्रश्न व गरजांची पूर्तता झाली का? राष्ट्रांची वर्चस्व व विस्तारवादी वृत्ती,संघर्ष याचे समीक्षात्मक विश्लेषण करणे अत्यावश्यक ठरते.

**उद्देशपत्रिकेची मूलभूत तत्त्वे** संयुक्त राष्ट्र संघाच्या उद्दिष्टपत्रात (Preamble) काही प्रमुख मुल्ये मांडली आहे. त्या मूल्यांच्या आधारे ही संस्था कार्य करणे अपेक्षित आहे.

१) शांततेचे संरक्षण २) मानवी हक्कांचा सन्मान ३) न्याय व आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन ४) आर्थिक व सामाजिक प्रगती ५) स्वातंत्र्य, समता आणि लोकशाही, बंधुता मूल्यांचा प्रसार पण आजच्या वास्तवात या तत्वांची अंमलबजावणी कितपत प्रभावी ठरली हे मानवी समूहासामोरील न उलगडलेलं कोडं आहे.

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा राखणे, राष्ट्रांमधील मैत्रीपूर्ण संबंध वृद्धिंगत करणे, मानवी हक्कांचे संरक्षण करणे आणि विकासासाठी सहकार्य निर्माण करणे ही त्याची मूलभूत उद्दिष्टे होती. या उद्दिष्टांच्या अंमलबजावणीसाठी संघाने विविध अंगांची रचना केली, त्यापैकी सर्वात प्रभावी अंग म्हणजे सुरक्षा परिषद (UN Security Council) सुरक्षा परिषदेला आंतरराष्ट्रीय शांततेस धोका निर्माण झाल्यास ठोस पावले उचलण्याचा अधिकार आहे; परंतु त्याचबरोबर पाच स्थायी सदस्यांना दिलेला व्हेटो अधिकार ही त्याची सर्वात मोठी मर्यादा ठरते. जणू या राष्ट्रांना सर्व जगातील राष्ट्रांवर नियंत्रण ठेवण्याचा परवाना दिला आह, असे वर्तन या राष्ट्रांचे आहे.

**सुरक्षा परिषदेची असमान रचना व महासत्तांचा राजकीय प्रभाव** संयुक्त राष्ट्रसंघाची सुरक्षा परिषद ही जागतिक शांततेचे मुख्य व्यासपीठ मानली जाते, सुरक्षा परिषद ही युएनची सर्वात प्रभावी संस्था असून त्यामध्ये पंधरा सदस्य आहे. त्यापैकी पाच स्थायी सदस्य म्हणजे अमेरिका, रशिया, चीन, फ्रान्स, ब्रिटन या देशांकडे व्हेटो अधिकार आहे, म्हणजेच कोणत्याही प्रस्तावावर या देशांपैकी एकाने नकार दिला तर तो प्रस्ताव अमान्य ठरतो. परंतु सध्याची रचना आजच्या बहुध्रुवीय जगात अत्यंत असमान आणि कालबाह्य असल्याची टीका केली जाते. केवळ पाच स्थायी मोजक्या राष्ट्रांकडे व्हेटो अधिकार असल्यामुळे निर्णयप्रक्रिया काही महासत्तांच्या हातात केंद्रित झाली आहे. यामुळे अनेक वेळा जागतिक हितापेक्षा राजकीय स्वार्थांना प्राधान्य मिळते. पूर्वी अमेरिकेने इस्रायलविरुद्धच्या अनेक ठरावांवर व्हेटो वापरला. “War on Terror” (इराक, अफगाणिस्तान) अभियान सुरू करताना युएन ला विश्वासात घेतले नाही. रशियाने युक्रेनवरील कारवाई संदर्भात अनेक ठराव रोखले. चीनने तिबेट व तैवान प्रश्नावर संयुक्त राष्ट्र संघाचा हस्तक्षेप होऊ दिला नाही.

यावरून स्पष्ट होते की, सुरक्षा परिषदेतील व्हेटो अधिकार आंतरराष्ट्रीय न्याय व समतेच्या तत्वांना बाधा आणतो. त्यामुळे संयुक्ते राष्ट्रे शांतता प्रस्थापित करण्यात असमर्थ ठरते. व्हेटो अधिकार हा द्वितीय महायुद्धातील शक्ती-संतुलनावर आधारित होता; पण आजचा भू-राजकीय परिदृश्य पूर्णपणे बदलला आहे. बहुध्रुवीय जगात अशा काही देशांना कायमस्वरूपी विशेष अधिकार देणे लोकशाही तत्त्वांच्या विरोधात आहे.

आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिका या खंडांचे प्रतिनिधित्व अत्यल्प असल्यामुळे जागतिक शक्तिसंतुलन वास्तवात परावर्तित होत नाही. भारत, ब्राझील, जपान आणि जर्मनी यांसारखे प्रभावशाली आणि जबाबदार देश आजही कायम सदस्यत्वापासून वंचित आहेत. परिणामी, “जगातील लोकांचे प्रतिनिधित्व” करण्याचा दावा करणाऱ्या या संस्थेवर “पाश्चिमात्य वर्चस्वा”चा ठसा उमटतो. संयुक्त राष्ट्रसंघाची रचना ही “समान सार्वभौमत्व” या तत्वावर आधारित आहे. प्रत्येक देशाला समान मताधिकार पण वास्तवात, महासत्तांच्या आर्थिक, लष्करी आणि राजनैतिक शक्तीमुळे युएनओच्या कार्यप्रणालीवर त्यांचा मोठा प्रभाव आढळतो. सुरक्षा परिषदेचे पुनर्रचना आणि सदस्यत्व विस्तार ही जागतिक न्याय आणि समतेसाठी आजची सर्वात मोठी गरज आहे.

संयुक्त राष्ट्र संघाकडे स्वतःचे स्थायी सैन्यदल नाही; शांतता सेनेचे कार्य सदस्य राष्ट्रांच्या योगदानावर अवलंबून असते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावरील सशस्त्र संघर्षात थेट हस्तक्षेप करण्याची त्याची क्षमता मर्यादित राहते. संयुक्त राष्ट्र संघाचे उद्दिष्टपत्र आदर्शवादी दृष्टिकोनाचे प्रतीक असले तरी वास्तवात युएनओ हे अनेक वेळा राजकीय व्यवहारवादाचे व्यासपीठ ठरले. अमेरिका, रशिया आणि चीन यांचे सामरिक हित निर्णय प्रक्रियेत प्राधान्य मिळवतात. तसेच, युएनचे मुख्य आर्थिक स्रोत विकसित देशांवर अवलंबून असल्यामुळे धोरणांवर त्यांचा अप्रत्यक्ष दबाव राहतो. निर्णय प्रक्रिया अनेकदा धीम्या आणि प्रशासकीय गुंतागुंतीच्या असतात, ज्यामुळे कार्यक्षमतेत अडथळे निर्माण होतात. या संघटनेवर राजकीय हस्तक्षेपाला समर्थन दिल्याचा आरोप उठतो. परिणामी, युएनचे उद्दिष्टपत्र आणि वास्तविकता यामध्ये मोठा फरक दिसतो. असे म्हणता येईल की संयुक्त राष्ट्र संघ सर्वसमर्थ नाही; तो महासत्तांच्या राजकारणाच्या पलीकडे जाऊ शकत नाही. परंतु जागतिक शांततेच्या आशेचा तो एकमेव व्यापक मंच आहे. युद्ध थांबविण्याची अंतिम जबाबदारी राष्ट्रांवर असली, तरी त्यांना संवादाच्या टेबलावर आणण्याची आणि मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देण्याची भूमिका संयुक्त राष्ट्र संघ प्रभावीपणे पार पाडत आहे? त्यामुळे वर्तमानातील इराण-इस्रायल, अमेरिका-इराण किंवा पाकिस्तान-अफगाणिस्तान संघर्षांच्या संदर्भातही संयुक्त राष्ट्र संघाची भूमिका अनिवार्य आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठरते. आज जगात अमेरिकेसारख्या शक्ती साम्राज्यवादी व विस्तारवादी भूमिकेमुळे संघर्ष विकोपाला गेला आहे, मोठ्या प्रमाणात या संघर्षामुळे जीवितहानी झाली आहे, जगात शस्त्र स्पर्धेमुळे अशांतता वाढली आहे. अश्या परीस्थितीमध्ये आज रोजी संयुक्त राष्ट्राचे स्वरूप हे नखं व दात काढलेला वाघासारखे झाले आहे. फक्त निवेदन देण्यापुरते काम संयुक्त राष्ट्र संघाचे राहले आहे असे दिसते. म्हणून युद्धाच्या आगीला शांत करण्याची खरी कसोटी शेवटी याच संयुक्त राष्ट्र संघाची आहे, असा आशावाद टिकून आहे.

**एकूणच,** संयुक्त राष्ट्र संघाचे उद्दिष्टपत्रात मांडलेले आदर्श हे शांतता, न्याय, समानता आणि सहकार्य आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. पण वास्तवात हे आदर्श फक्त कागदावर मर्यादित राहू नयेत, हीच काळाची गरज आहे. जगाला आजही एक प्रभावी, निष्पक्ष आणि न्यायाधिष्ठित आंतरराष्ट्रीय संघटनेची गरज आहे. संयुक्त राष्ट्र संघाने जर आपल्या तत्त्वांचा आत्मा पुन्हा जिवंत ठेवला, तरच तो खऱ्या अर्थाने “We the peoples of the United Nations...” या शब्दांना न्याय देऊ शकेल.



**सुनील भारोडकर,**
**नाशिक**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०३ मार्च २०२६


# रेती माफियाचा गोरख धंदा..!



**जिंतुर (बी.डी.रामपूरकर) :** तालुक्यात व शहरात रेती माफियाचा बोलबाला असून महसूल प्रशासन कायद्याचे चकोटीतून कसे वाळु माफियाना सहकार्य मिळते यासाठी प्रयत्नशील असतात याचा मोठा उदाहरण दि.२४/२/२०२६ रोजी वाळूने भरलेला हायवा वाहतूक करत असताना पकडण्यात आला मात्र हा अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा कोण पकडला हे गुलदस्त्यात बंद आहे तर हायवा वर कारवाई संशयस्पद झाल्याची चर्चा मात्र तहसील कार्यालया परिसरात जोरात होत आहे या बाबत असे कि दि.२४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी एका सामाजिक प्रतिष्ठित कार्यकर्ता व पोलीस प्रशासने पांढरा व निळ्या रंगाचा अवैध वाळू वाहतूक करत असलेला हायवा क्र.एम एच २२ ऐ. एन.६११२ पकडला व महसूल प्रशासनाला कळविले यावरून महसूल विभागातील मौजे शेवडी येथील तलाठी यांनी सदर हयवा पोलिसांच्या मदतीने तहसील कार्यालय येथे जप्त करून ताब्यात घेतले यात अंदाजे ५ ते ७ बरास वाळू आढळून आल्याचा अहवाल मौजे शेवडी तलाठी शिंदे यांनी तहसीलदार जिंतुर यांना पंचनामा करून सादर केले.

**महसूल प्रशासनाची कारवाई...** जिंतुर तहसीलदार यांच्या अहवालानुसार उपविभागीय अधिकारी सेलू यांनी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा चालकावर स्वतःच्या फायद्यासाठी शासनाचा महसूल बुडून विनापरवाना बेकायदेशीर रेती चोरून विक्री करण्यासाठी घेऊन जात असताना मिळून आले असल्याने जप्त वाहन क्र. एम एच २२ ऐ. एन ६११२ या वाहनामध्ये अंदाजे सहा बरास रेती (वाळू) व वाहन तहसील कार्यालय येथे जप्त करण्यात आले म्हणून १९६६ चे कलम ४८(७)(८) व शासन राजपत्र दि. १२ जानेवारी २०१८ अन्वये ३८६९६०/- रु दंड आकारून वसूल करण्याचे आदेश शैलेश लाहोटी उपविभागीय अधिकारी सेलू दिला आहे

जिंतुर महसूल प्रशासनाची भूमिका संशयस्पद कशी..! महसूल प्रशासन या रेती चोरी प्रकरणी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करणार काय तसेच दि. २४ फेब्रुवारी रोजी सुमारे सायंकाळी ७ ते ८ वाजताच्या दरम्यान पकडण्यात आलेला अवैध वाळू वाहतूक करणारा हायवा क्र एम एच २२ ऐ. एन ६११२ हा अवैध वाळु विनापरवाना अवैध रेती वाहतूक चोरून बेकायदेशीर करत नव्हता कारण या हायवा चालकाकडे महसूल व वन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय खनिकर्म शाखा यांचा गौण खनिज परवाना होता ज्याचा (पुस्तक क्र. २ पावती क्र.८३ )( पुस्तक क्र. २ पावती क्र.८४) (पुस्तक क्र.६९ पावती क्र.३८२५) असे तीन वाहतूक परवाना हायवा सोबत होते यात तिन्ही परवान्यावर एकूण पाच ब्रास रीती असल्याचे नम्रूद केलेले आहे विशेष म्हणजे या परवान्यावर तारीख वेळ एकच होती हायवा सोबतचे गौण खनिज वाहतूक परवाना बोगस होता काय यामुळे परवाना कागदपत्रे दाखविण्यात आले नही असे दिसून येते सदर हायवा मध्ये तलाठी सज्जा शेवडी यांचे पंचनामेनुसार हायवा मध्ये एकूण ५ ते ७ बरास वाळू साठा होता तर या हायवेतील रेतीची मोजमाप का करण्यात आले नाही व वाळू वाहतूक करणाऱ्या एका हायवा ला जिंतुर तालुक्यातील वझर बुद्रुक पूर्णानदी पात्रातील धक्केदार रमेश गीते यांनी एका वाहनाला एकच गौण खनिज परवाना दिलेला नाही व तीन-तीन गौण खनिज वाहतूक परवाने दिले आहे व गौण खनिज परवाण्यावर तारीख वेळ सारखी जुळून येते व एकच वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांना वाहनातील एकूण वाळूसाठीची एकच पावती का देण्यात आली नाही..?पूर्णा नदी पात्रातील वाळु धक्केदार बोगस गौण खनिज परवाने देऊन वाहतूक करतात काय असे अनेक संशय स्पद प्रश्न समोर येते असल्याची चर्चा होत आहे काही असो याप्रकरणी महसूल प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गुरुजींची सेवानीवृत्ती

फळ्यावर अक्षर उमटवताना  
स्वप्नांची बीजे पेरलीत तुम्ही,  
अंधाऱ्या वाटेवर ज्ञानदीप  
हातात धरून चाललात तुम्ही.

कितीतरी पिढ्या घडवताना  
स्वतःचा काळ विसरलात,  
विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी  
जीवनभर झटत राहिलात.

कधी कठोर, कधी मायेचा स्पर्श,  
कधी मार्गदर्शक दीप झालात,  
चुकलो आम्ही जेव्हा वाटेत  
तेव्हा शांतपणे उभे राहिलात.

आज शाळेची ती घंटा जरी  
तुमच्यासाठी शेवटची वाजली,  
तरी तुमच्या शिकवणीची गाथा  
आमच्या आयुष्यात सदैव राहिली.

पुस्तक, फळा आणि वर्गखोली  
आज थोडीशी उदास झाली,  
कारण आमची प्रेरणा असलेली  
व्यक्ती आज निवृत्त झाली.

सेवा संपली म्हणू नका याला,  
हे तर यशाचं सुवर्ण पान आहे,  
कारण हजारो विद्यार्थ्यांच्या मनात  
आजही तुमचं स्थान महान आहे.

नम्र अभिवादन गुरुजनांना,  
तुमचा आशीर्वाद साथ राहो,  
उर्वरित आयुष्य आनंदाने  
आरोग्य, समाधानात जावो.

**भगवंत पाळवदे**  
**अंबाजोगाई**  
**एकल महिला व अनाथ बालक पुनर्वसन प्रकल्प**

# प्राचार्य डॉ अस्वले यांना करिअर कट्टा राज्यस्तरीय उत्कृष्ट प्राचार्य प्रवर्तक पुरस्कार



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करिअर कट्टा अंतर्गत २०२५-२६ चा राज्यस्तरीय उत्कृष्ट प्राचार्य प्रवर्तक पुरस्कार छत्रपती संभाजीनगर विभागातून श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यांना अध्यक्ष यशवंत शितोळे, अजय धोंडे , सिनेट सदस्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, प्राचार्य डॉ हरिदास विधाते, डॉ. वसंत सानप, माजी सिनेट सदस्य आणि बलभीम महाविद्यालयाचे माजी प्राचार्य यांच्या हस्ते देण्यात आला.आनंदराव धोंडे महाविद्यालय कडा येथे दि. ०२ मार्च रोजी आयोजित करिअर कट्टा कार्यशाळेत हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी महाविद्यालय करिअर कट्टा विद्यार्थी संसदेस उत्कृष्ट विद्यार्थी संसद आणि इतर पाच पुरस्कार मिळाले.समन्वयक डॉ एस पी पसरकल्ले, डॉ सी.डी करे, डॉ ए के कटके, विद्यार्थी संसद मुख्यमंत्री अनिशा सुरवसे, गणेश मोरे, आसिफ शेख, सैफ इनामदार, दिशा सुरवसे, योगेश्वरी मारकर आदींनी पुरस्कार स्विकारले.यावेळी जिल्हा प्राचार्य प्रवर्तक मोहम्मद इलियास सर. प्राचार्य शिरीष पवार प्राचार्य मुळे सर प्राचार्य निंभोरे सर प्राचार्य डोंगरे सर. प्राचार्य जगदाळे मॅडम भगवान परकाळ , जिल्हा समन्वयक दत्तात्रय नरसाळे विभागीय सह समन्वयक लक्ष्मीनारायण कुरूपटवार यांची उपस्थिती होती त्याच्या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेष मोरे, सरचिटणीस जनार्दन साठे, सचिव पद्माकर हराळकर, सहसचिव डॉ सुभाष वाघमोडे, उपप्राचार्य डॉ पी ए पिटले उप प्राचार्य डॉ व्ही एस इंगळे उपप्राचार्य प्रा जी एस मोरे पर्यवेक्षक प्रा एस ए महामुनी , श्री राजकुमार सोनवणे श्री नितीन कोराळे आणि प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# रंगपंचमी

धुलिवंदन हा भारतीय संस्कृतीतील आनंद, उत्साह आणि बंधुभाव वाढवणारा महत्त्वाचा सण आहे. हा सण प्रामुख्याने होळीच्या दुसऱ्या दिवशी साजरा केला जातो. काही ठिकाणी याला रंगपंचमी असेही म्हणतात. या दिवशी लोक एकमेकांवर रंग, गुलाल उधळून आनंद व्यक्त करतात.सणाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वधुलिवंदनाचा संबंध वाईटावर चांगल्याचा विजय या भावनेशी जोडलेला आहे. होळीच्या दिवशी होलिका दहन करून दुष्ट प्रवृत्तींचा नाश झाल्याचे प्रतीक मानले जाते, आणि दुसऱ्या दिवशी धुलिवंदन साजरे करून आनंदोत्सव केला जातो.या दिवशी समाजातील भेदभाव विसरून सर्वजण एकत्र येतात, एकमेकांना रंग लावतात आणि मैत्री व प्रेम वाढवतात.महाराष्ट्रात धुलिवंदन मोठ्या उत्साहाने साजरे केले जाते. लोक गुलाल, रंग, पाणी, पिचकारी वापरून खेळतात. गावात आणि शहरात ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुका काढल्या जातात. मित्र, नातेवाईक आणि शेजारी एकमेकांच्या घरी जाऊन शुभेच्छा देतात.सणाचे सामाजिक महत्त्वधुलिवंदन हा फक्त रंगांचा सण नसून तो एकात्मता, आनंद आणि मैत्रीचे प्रतीक आहे. लोकांमधील मतभेद विसरून नवीन नातेसंबंध मजबूत करण्याची ही संधी असते. मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण हा सण उत्साहाने साजरा करतात.सुरक्षित आणि पर्यावरणपूरक साजराआजकाल धुलिवंदन साजरा करताना काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे:नैसर्गिक किंवा सेंद्रिय रंगांचा वापर करणेपाण्याची नासाडी टाळणेजबरदस्तीने रंग लावू नयेपर्यावरणाची आणि इतरांच्या आरोग्याची काळजी घेणेनिष्कर्षधुलिवंदन हा रंग, आनंद आणि प्रेमाचा सण आहे. हा सण आपल्याला एकत्र राहण्याची, आनंद वाटण्याची आणि समाजात बंधुभाव वाढवण्याची शिकवण देतो. भारतीय संस्कृतीतील हा सण लोकांच्या जीवनात नवचैतन्य आणि उत्साह निर्माण करतो.

**भगवंत पाळवदे**




# महाराष्ट्रात पहिल्यांदाच CCTV च्या निगराणीखाली दहावी व बारावीच्या परीक्षा आणि परिणाम

**अंबाजोगाई (भगवंत पाळवदे) :** वंदेमातरम आयटीआय कॉलेजमहाराष्ट्र राज्यात शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा वाढवण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. यावर्षी प्रथमच दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षा CCTV कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली घेतल्या जात आहेत. या निर्णयामुळे परीक्षेतील गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवणे आणि विद्यार्थ्यांना न्याय्य वातावरण देणे हा मुख्य उद्देश आहे.या निर्णयामागील उद्देशकाही वेळा परीक्षांदरम्यान कॉपी, पेपरफुटी किंवा इतर गैरप्रकार घडल्याच्या घटना समोर येत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रामाणिक मेहनतीवर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने परीक्षा केंद्रांवर CCTV बसवून संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.यामुळे परीक्षेतील शिस्त राखली जाईल आणि गैरप्रकारांना आळा बसेल अशी अपेक्षा आहे.कशी ठेवली जाते निगराणीपरीक्षा केंद्रातील वर्गखोल्यांमध्ये CCTV कॅमेरे बसवलेले असतात.नियंत्रण कक्षातून अधिकाऱ्यांकडून थेट निरीक्षण केले जाते.संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित कारवाई केली जाते.संपूर्ण परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक बनवली जाते.विद्यार्थ्यांवर होणारा परिणामया व्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना वाढते. प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फायदा होतो. सर्वांना समान संधी मिळाल्याने निकाल अधिक विश्वासार्ह ठरतात.शिक्षण व्यवस्थेसाठी सकारात्मक पाऊलतंत्रज्ञानाचा वापर करून परीक्षा पद्धती अधिक सक्षम करण्याचा हा प्रयत्न आहे. यामुळे भविष्यातील परीक्षाही अधिक सुव्यवस्थित आणि पारदर्शक होतील. तसेच पालक आणि समाजाचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास वाढण्यास मदत होईल.निष्कर्षमहाराष्ट्र CCTV च्या निगराणीखाली घेतल्या जाणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा हा शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाचा बदल आहे. प्रामाणिकपणा, शिस्त आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी हा निर्णय निश्चितच उपयुक्त ठरेल. विद्यार्थ्यांनीही मेहनत, प्रामाणिकपणा आणि आत्मविश्वासाने परीक्षा देणे हीच खरी यशाची गुरुकिल्ली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षांमध्ये यावर्षी प्रथमच CCTV कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली परीक्षा घेण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढवणे, गैरप्रकारांना आळा घालणे आणि विद्यार्थ्यांना प्रामाणिक वातावरण मिळावे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.राज्यातील अनेक परीक्षा केंद्रांवर वर्गखोल्यांमध्ये CCTV कॅमेरे बसवण्यात आले असून नियंत्रण कक्षातून त्यावर लक्ष ठेवले जात आहे. काही ठिकाणी वरिष्ठ अधिकारी तसेच शिक्षण विभागाचे कर्मचारी थेट निरीक्षण करत आहेत. संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, या व्यवस्थेमुळे कॉपीसारखे प्रकार कमी होतील आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीला योग्य न्याय मिळेल. परीक्षा केंद्रांवरही शिस्तबद्ध वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.विद्यार्थी व पालकांनीही या निर्णयाचे स्वागत केले असून परीक्षेची विश्वासार्हता वाढेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा प्रक्रिया अधिक सुरक्षित व पारदर्शक करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# संस्कारांची गंगोत्री कविताच : प्रा. वा. ना. आंधळे



**पारोळा :** संस्कार हा मानवी आयुष्याचा अविभाज्य भाग असून संस्काराने मानवी जीवनाला मूल्य प्राप्त होते.माणूस हा संस्कारांनी ओळखला जातो.ही संस्कारांची खाण कविता या साहित्य प्रकारातून मानवी आयुष्यात आलीय.ती कशी हे अनेक कवनांचे दाखले देत एरंडोल येथील सुप्रसिद्ध कवी प्रा.वा. ना.आंधळे यांनी पारोळा येथील बोहरा सेंट्रल स्कूल आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसमोर काव्यमहतीसाधार मांडली. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.त्यावेळी व्यासपीठावर बोहरा सेंट्रल स्कूलचे संचालक मा. बोहराजी,प्राचार्या श्रीमती शोभा सोनी,मराठी विभाग प्रमुख सौ.मंजुषा पाटील व अन्य मराठी शिक्षिका भगिनींनी उपस्थिती होती. ते आपल्या व्याख्यानात पुढे म्हणाले की,मराठीचे प्राचीनत्व आणि मराठी साहित्याची अनेक साहित्य प्रकारातून झालेली वाटचाल ही तिच्यातल्या अभिजाततेचे नितांत दर्शन घडवणारी आहे.असे सांगत श्रेष्ठ कवी वि.वा. शिरवाडकरांचे साहित्य योगदान हे आभाळउंचीचे असून समाजसमृद्धीसाठी ते ठायीठायी कामी आलेय.असे सांगत काही कवींच्या कवितांचे रंजन व प्रबोधन या दृष्टीने त्यांनी बहारदार सादरीकरण केले. यावेळी मराठीची थोरवी व महाराष्ट्राची थोरवी गाणाऱ्या गीतांवर विद्यार्थीनींनी विविध नृत्य सादर केलीत.याच समारंभात तेरा मराठी शिक्षिका भगिनींचा सत्कार प्रा.आंधळे यांचे शुभहस्ते करण्यात आला.अशा या भरगच्च समारंभाचे सूत्र संचलन व आभार प्रदर्शन बोहरा सेंट्रल स्कूलच्या विद्यार्थीनींनी केले.

